N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** सिंधुदुर्ग **P.S.(ठाणे):** सावंतवाडी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0288 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**13/10/2023 12:23

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार

**Time Period (कालावधी):** पहर 6

**Date From (दिनांक पासून):** 12/10/2023

**Date To ( दिनांक पर्यंत):** 12/10/2023

**Time From (वेळेपासून):** 18:22 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 18:22 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 12/10/2023 **Time (वेळ):** 18:22 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 012

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 13/10/2023 11:58 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सावंतवाडी पोलीस ठाणे,सावंतवाडी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सिध्दात भगवान परब

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | स्वप्नाकुर रो बंगला,भटवाडी,सावंतवाडी,सावंतवाडी,सावंतवाडी,सिंधुदुर्ग, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | स्वप्नाकुर रो बंगला,भटवाडी,सावंतवाडी,सावंतवाडी,सावंतवाडी,सिंधुदुर्ग, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9403594016

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सपोनि श्री सागर संपत खंडागळे | | | 1. सावंतवाडी पोलीस ठाणे, सावंतवाडी,सावंतवाडी,सिंधुदुर्ग, महाराष्ट्र,भारत |
| 2 | पोउपनि श्री सुरज जगन्नाथ पाटील | | | 1. सावंतवाडी पोलीस ठाणे, सावंतवाडी,सावंतवाडी,सिंधुदुर्ग, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 100000/रुपये भारतीय चलनी नोटा | 100,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

100,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी सिध्दांत भगवान परब, वय-38 वर्षे, व्यवसाय- बिल्डर अँण्ड डेव्हलपर्स, रा.स्वप्नांकुर रो बंगला, नं 2 बटवाडी , ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग (मोबाईल नंबर 9403594016) समक्ष सावंतवाडी पोलीस ठाणे येथे हजर राहुन खबर लिहुन देतो की,मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहतो. माझा सावंतवाडी येथे बिल्डर अँण्ड डेव्हलपर्सचा व्यवसाय आहे. माझा व्यवसायाचे माध्यमातून श्री.अशोक श्रीरंग पवार, रा.सावंतवाडी यांचे सोबत मागील 7 ते 8 वर्षापासुन परिचय आहे. दिनांक 06/09/2023 रोजी श्री.अशोक पवार यांनी माझेविरुध्द सावंतवाडी पोलीस ठाणे येथे सदनिका खरेदी - विक्रीच्या व्यवहारावरुन सावंतवाडी पोलीस ठाणे कॉ.गु.रजि. नं 252/2023 भादवि 420व इतर प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्हयामध्ये सावंतवाडी पोलीस ठाणे येथील सपोनि श्री.सुरज पाटील हे मला वारंवार संपर्क साधुन मला गुन्हयामध्ये सहकार्य करण्यासाठी गुन्ह्याचे तपासी अधिकारी सपोनि श्री. खंडागळे यांना एक लाख रुपये दयावे लागतील.त्यानंतर तुम्हाला गुन्हयामध्ये सहकार्य करतील असे सांगत होते. त्यावेळी मी त्यांना माझे उच्च न्यायालय मुंबई येथील अटकपुर्व जामीनाचे काम झाल्यानंतर मी तुम्हाला भेटतो असे सपोनि श्री. सुरज पाटील यांना सांगितले होते. सदर गुन्ह्यात मला अटकेपासुन बचाव होणेसाठी उच्च न्यायालय, मुंबई येथुन अटकपुर्व जामीनाचे आदेश झाले आहेत. त्यानंतर देखील सपोनि श्री.सुरज पाटील हे मला फोन करुन वारंवार सपोनि श्री.खंडागळे साहेबांना काहीतरी द्यावे लागेल अन्यथा तुम्हाला गुन्हयात त्रास होईल असे सांगत होते. परंतु मला सपोनि श्री.पाटील व सपोनि श्री.खंडागळे सावंतवाडी पोलीस ठाणे यांना लाच देण्याची इच्छा नसुन त्यांना लाच दिली नाहीतर ते माझेविरुध्द दाखल असलेल्या नमुद गुन्हयात मला त्रास देण्याची शक्यता आहे. तरी माझी सावंतवाडी पोलीस ठाणे येथील सपोनि श्री.सुरज पाटील हे सपोनि श्री.खंडागळे यांचेसाठी गुन्हयात सहकार्य करावे या उद्देशाने माझ्याकडे 1 लाख रुपये लाचेची मागणी करीत असल्याने सपोनि श्री.सुरज पाटील हे सपोनि श्री. खंडागळे यांच्याविरुध्द योग्य ती कारवाई होणेकरीता मी दिनांक 08/10/2023 रोजी पोलीस निरीक्षक , श्री. रणजित गलांडे , अँन्टी करप्शन ब्युरो , रायगड अलिबाग यांची सावंतवाडी फाटा , ता.सावंतवाडी जि.सिंधुदुर्ग येथे भेट घेवुन माझी ओळख करुन दिली. तसेच पोनि श्री.गलांडे यांनी त्यांची व त्यांचे सोबत असलेल्या कारवाई पथकातील अंमलदार यांची ओळख करुन दिली.त्यानंतर मी वरीलप्रमाणे सावंतवाडी पोलीस ठाणे नेमणुकीतील सपोनि श्री.सुरज पाटील व सपोनि श्री.खंडागळे यांचेविरुध्द कारवाई करण्याबाबत तक्रार दिली.तसेच सपोनि श्री. सुरज पाटील व सपोनि श्री.खंडागळे हे दिनांक 09/10/2023 रोजी दुपारनंतर भेटण्याची शक्यता असलेने मी दुपारी सावंतवाडी येथे येवुन भेटेन असे पोलीस निरीक्षक श्री.गलांडे यांना मी सांगितले त्यावरुन पोलीस निरीक्षक श्री.गलांडे यांनी मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने पंचासमक्ष पडताळणी करण्यात येईल व पडताळणीमध्ये लोकसेवक यांनी लाचेची मागणी केल्यास त्यानंतर त्यांचे विरुध्द लाचेचा सापळा आजमाविण्यात येईल असे सांगुन त्यानी मला दिनांक- 09/10/2023 रोजी दुपारी 12.00 वा सावंतवाडी मोती तलावाजवळ हजर राहणेबाबत सुचना दिल्या. पोलीस निरीक्षक श्री.गलांडे याच्या सुचनेनुसार मी दिनांक 09/10/2023 रोजी दुपारी सावंतवाडी मोती तलावाजवळ जायला निघालो असता पोनि श्री.गलांडे यांनी माझ्या मोबाईलवर कॉल करुन मोती तलावाजवळील हॉटेल रॉयल पॅलेस येथे रुम नं 106 येथे येण्यास सांगितले प्रमाणे मी 13.05 वा च्या सुमारास हॉटेल रॉयल पॅलेस येथे रुम 106येथे जावुन पोलीस निरीक्षक श्री.गलांडे व त्यांचे सोबतचे पथकास भेटले पोलीस निरीक्षक श्री.गलांडे यांनी त्यांचेसोबत असलेल्या पथकातील 02ईसम हे पंच साक्षीदार असल्याचे सांगुन त्याची नावे 1) श्री.अनिरुध्द अनिल ढगे वय-37 वर्षे, वनपरिक्षेत्र अधिकारी माणगाव तालुका. माणगाव जिल्हा .रायगड व 2) श्री. अनिल मनोहर

मोरे वय-29 वर्षे, वनरक्षक खरडी माणगाव वनपरिक्षेत्र माणगाव तालुका. माणगाव जिल्हा .रायगड अशी असल्याचे सांगुण त्यांची ओळख दिली व त्यांचेशी माझी ओळख करुन दिली.तसेच पथकातील अंमलदार यांची ओळख करुन देवुन त्यांना माझी ओळख करुन दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.गलांडे यांनी मला सांगितले की, दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पंचासमक्ष पडताळणी करण्यात येईल व पडताळणीमध्ये लोकसेवक यांनी लाचेची मागणी केल्यास त्यानंतर त्यांचे विरुध्द लाचेचा सापळा आजमाविण्यात येईल. सपोनि श्री.सुरज पाटील व सपोनि श्री. खंडागळे हे सायंकाळी भेटणार असल्याचे त्यांनी कळविले असल्याचे मी पोनि श्री.गलांडे यांना सांगितले तसेच माझी तब्बेत ठीक नसुन मला डॉक्टरकडे जाणे आवश्यक मी.सपोनि श्री.सुरज पाटील यांनी मला बोलाविल्याचा फोन येताच सायंकाळी हॉटेल रॉयल पॅलेस येथे येवुन कारवाई पथकास भेटतो असे पोनि श्री.गलांडे यांना सांगुन मी तेथुन निघून गेलो. त्यानंतर सायंकाळी सपोनि श्री.सुरज पाटील यांनी मला कॉल करुन ते स्व;त व सोबत सपोनि श्री. खंडागळे हॉटेल टीफीन सावंतवाडी येथे येणर असुन तेथे येवुन भेटनेबाबत कळविलेने. मी तात्काळ हॉटेल रॉयल पॅलेस येथे 19.05 वा जावुन तसे पोनि श्री.गलांडे यांना भेटुन कळविले. त्यानंतर पोनि श्री.गलांडे यांनी पडताळणी कार्यवाहीबाबत आम्हांस व पंचास माहीती देवुन योग्य त्या सुचना दिल्या आणि 19.32 वा माझी व पंचाची वक्तव्य डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनी मुद्रीत करुन घेतली त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.गलांडे यांनी पडताळणी करीता मी माझी TVS ज्युपीटर मोटर सायकल क्रमांक MH-07-Q-4266 या वाहनाने पंच नं 1 ) श्री.ढगे यांचेसह सावंतवाडी येथील हॉटेल टीफीन येथे जाण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी दिलल्या तक्रारीचे पडताळणी करण्यासाठी सुमारे 19.37 वा माझेकडे व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देण्यात आले त्यानंतर मी व पंच नं 1) श्री.ढगे असे दोघे पडताळणी पथक थांबलेल्या ठीकाणावरुन माझी VS ज्युपीटर मोटर सायकल क्रमांक MH-07-Q-4266 या वाहनाने लोकसेवक यांची भेट घेण्याकरीता हॉटेल टीफीन येथे गेलो. तेथे काही वेळा थांबुन राहीलो तरी सपोनि श्री.सुरज पाटील व सपोनि श्री.खंडागळे आले नाहीत म्हणुन मी सकाळी सुरज पाटील यांना माझे मोबाईल नंबर 9403594016 वरुन त्यांचा मोबाईल नंबर 9021310310 वर कॉल करुन संर्पक केला असता सपोनि श्री.सुरज पाटील यांनी मला हॉस्पीटल समोरील हॉटेल गजानन येथे येवुन भेटण्यास सांगितले त्यानुसार मी माझे मोटर सायकलने पंच नं १)श्री.ढगे यांचेसह टीफीन हॉटेल येथुन निघुन गजानन हॉटेल येथे जावुन तेथे हजर असलेले सपोनि श्री.सुरज पाटील यांची भेट घेतली तेव्हा सपोनि श्री.खंडागळे 2 दिवस बाहेर गेले असल्याचे सपोनि श्री.पाटील यांनी सांगितले मी सपोनि श्री.पाटील यांच्याशी माझे विरुध्द दाखल गुन्हायाबाबत चर्चा केली असता लोकसेवक श्री.पाटील यांनी सपोनि श्री.खंडागळे यांनी एकत्र बसुन सविस्तर बोलुन घेवु असे म्हणुन , आणलेत ? असे बोलुन पैंशाबाबत विचारणा केली .त्यानंतर मी व पंच श्री.ढगे असे तेथुन निघुन माझे मोटारसायकलने पडताळणी पथक थांबलेल्या ठिकाणी हॉटेल रॉयल पॅलेस येथे 20.18 वा परत आलो.सदरचे समक्ष भेटीतील संभाषण व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आले आहे. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.गलांडे यांनी सदर संभाषणावरून लोकसेवक सपोनि श्री खंडागळे कधी भेटतील यबाबात माझेकडे विचारणा केली असता सपोनि श्री खंडागळे हे दोन दिवस भेटणार नसल्याचे सपोनि श्री सुरज पाटील यांनी मला सांगितले असल्याचे मी पोनि श्री.गलांडे यांना सांगितले.त्यामुळे पोलीस निरीक्षक श्री.गलांडे यांनी लोकसेवक सपोनि श्री.खंडागळे यांची भेट न झालेने व लाचेची स्पष्ट मागणी न झालेने दिनांक 11/10/2023 रोजी लोकसेवक यांची पडताळणी करण्याचे निश्चित करून आजची पडताळणी स्थगित करण्याचे ठरवुन मला संपर्कात राहुन लोकसेवक भेटण्याच्या शक्यतेची मोबाईल फोनव्दारे माहीती कळविणेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर दिनांक 11/10/2023 रोजी मी लोकसेवक श्री सुरज पाटील यांना मोबाईल फोनव्दारे संपर्क करून ते सपोनि श्री खंडागळेसह आज भेटू शकतील का याबाबत माहीती घेतली असता ते सपोनि खंडागळेसह हॉटेल टिफिन येथे दुपारी भेटू असे त्यांनी कळविले.त्याप्रमाणे मी कारवाई पथकातील पोनि.श्री गलांडे यांना मोबाईल फोनव्दारे संपर्क करून माहीती दिली.त्यानंतर पोनि श्री गलांडे यांनी त्याच्या मोबाईल फोनवरून मला कॉल करून तात्काळ सातपाटेकर मंदीर मळगाव,ता.सावंतवाडी येथे येवुन भेटण्याची सुचना केली.त्यानुसार मी माझा चालक श्री.अनंत सुभेदार यांचेसह माझ्या मारुती सुझुकी स्पिफ्ट डिझायर क्र. MH-07-Q-3635 ने 13.50 वा. सातपाटेकर मंदीर मळगाव,ता.सावंतवाडी येथे जावुन पोनि.श्री गलांडे पंच साक्षीदार व कारवाई पथकास भेटलो. पोनि श्री गलांडे यांनी मला सांगितले की,मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 09/10/2023 रोजी पंचासमक्ष पडताळणी करण्यात आलेली असुन लोकसेवक सपोनि. श्री सुरज पाटील यांनी सपोनि श्री खंडागळे आल्यानंतर एकत्र बसुन सविस्तर बोलुन घेवु असे म्हणुन,आणलेत असे पैशांबाबत विचारणा केली होती त्यामुळे लोकसेवक सपोनि श्री.खंडागळे यांची भेट न झालेने व लाचेची स्पष्ट मागणी न झालेने लोकसेवक यांची पुन्हा पडताळणी करणे आवश्यक असल्याने तक्रारीचे पडताळणी करण्यात येणार असुन त्या पडताळणीमध्ये लोकसेवकाने लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्यानंतरच लाचेचा सापळा आयोजित केला जाईल याबाबत सुचना दिल्या. त्यानंतर पोनि श्री गलांडे यांनी पडताळणीचे कार्यवाहीबाबत आम्हास व पंचास माहीती

देवुन याग्य त्या सुचाना दिल्या आणि 14.15 वा माझी व पंचाची वक्तव्य डिजिटल व्हाईस रेकार्णेडरमध्ये ध्वनी मुद्रीत करून घेतले.त्यानंतर पोनि.श्री गलांडे यांनी पडताळणी करीता माझी मारूती सुझुकी स्पिफ्ट डिझायर क्र. MH-07-Q-3635 या वाहनाने पंच नं.1 श्री ढगे यांचेसह हॉटेल टिफीन येथे जाण्याच्या सुचना दिल्या त्याप्रमाणे 14.21 वा. व पंच नंबर 1.श्री ढगे व माझा चालक श्री.अनंत सुभेदार यांचेसह पडताळणी पथक थांबलेल्या ठिकाणावरून माझे मारूती सुझुकी स्पिफ्ट डिझायर कार ने लोकसेवक यांची भेट घेणेकरीता हॉटेल टिफिन सावंतवाडी येथे गेलो.तेथे फक्त लोकसेवक सपोनि श्री सुरज पाटील हे हजर होते.त्याच्याशी झालेल्या संभाषणाच्या वेळी त्यांनी संध्याकाळी 07.00 वा भेटण्यास बोलाविले व परवा बोलले तेवढे आधी घेवुन या आपण तेवढ्याच संपविण्याचा प्रयत्न करू असे सांगितले.तसेच संध्याकाळी तयारीने या असे बोलुन मला हाताचे बोटाचे इशाराने एक आकडा दाखवुन एक लाख रूपये लाचेची मागणी केली.त्यानंतर मी व पंच श्री ढगे व माझा चालक श्री अनंत सुभेदार असे हॉटेल टिफिन येथुन मारूती सुझुकी स्पिफ्ट डिझायर कार मधुन पडताळणी पथक थांबलेल्या ठिकाणी सातपाटेकर मंदीर मळगाव येथे 15.21 वा परत आलो.सदरचे समक्ष भेटीतील संभाषण व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आले आहे. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.गलांडे यांनी व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण ऐकुन लोकसेवक सपोनि/श्री.सुरज पाटील यांनी 1,00,000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे व सायंकाळी 07.00 वाजता तयारीने या असे सांगितल्याचे निष्पन्न होत असल्याने तसेच सपोनि/श्री.खंडागळे यांची पडताळणी अजुनही झालेली नसल्यामुळे पोलीस निरीक्षक श्री.गलांडे यांनी लोकसेवक श्री.खंडागळे यांची पडताळणी करणे आवश्यक असल्याने सायंकाळी लोकसेवक यांची पुन्हा पडताळणी करण्याचे निश्चीत करुन मला पथका सोबत थांबुन राहण्याची सुचना दिली. परंतु माझी तब्येत ठिक नसल्याने मला उपचार घेण्यासाठी सोडण्याबाबत मी पोनि/श्री. गलांडे यांना विनंती केल्यानंतर पोनि/श्री.गलांडे यांनी मला सहा.पोलीस निरीक्षक श्री.पाटील यांनी संपर्क केल्यानंतर तात्काळ संपर्क करणेबाबत सुचना दिल्या. तसेच मोबाईल संपर्क केल्यानंतर कळविल्या ठिकाणी हजर राहण्याच्या मला सुचना दिल्या. त्यानंतर मी सातपाटेकर मंदिर, मळगांव येथुन निघुन माझ्या कारने सावंतवाडी येथे गेलो. त्यानंतर सायंकाळी मी सावंतवाडी येथील श्री.साई हॉस्पीटल दवाखान्यात असताना सपोनि/श्री.सुरज पाटील यांच्याशी मोबाईल फोनवरुन कॉल झाला कॉल झाला तेव्हा माझगांव नाला येथे ते स्वतः व सोबत सपोनि/श्री. खंडागळे येणार असुन तेथे येवुन भेटणेबाबत कळवीलेने मी तात्काळ पोनि/श्री.गलांडे यांना मोबाईलवर कॉल करुन कळविले त्यावेळी पोनि/श्री.गलांडे यांनी मला श्री.साई हॉस्पिटल दवाखान्यातच थांबण्याची सुचना केली व ते पथकासह श्री.साई हॉस्पिटल दवाखान्याकडे येत असल्याचे सांगितले. त्यानंतर पोनि/श्री.गलांडे हे पंच व पथकासह 19.17 वाजता श्री.साई हॉस्पीटल समोरील रस्त्यावर येवुन मला भेटले. पोनि/श्री.गलांडे यांनी मला पुन्हा पडताळणीकरीता पाठविण्यात येणार असल्याचे सांगुन पडताणी करीता माझी मारूती सुझुकी स्पिफ्ट डिझायर क्र. MH-07-Q-3635 या वाहनाने पंच नं.1 श्री ढगे यांचेसह मझगाव नाला येथे जाण्याच्या सुचना दिल्या.त्याप्रमाणे 19.30 वा.व्हाइस रेकॉर्डर चालु करून माझेकडे देण्यात आले नंतर मी व पंच श्री ढगे असे माझे कारने चालक श्री सुभेदार यांचेसह जिमखाना येथुन निघुन बाजारपेठेतुन माझगाव एमआयडीसी परीसरातच गेलो.तेथे लोकसेवक हे हजर नसल्याने मी सपोनि श्री पाटील यांना कॉल केला व माझगाव एमआयडीसी थांबलो असल्याचे सांगितले. थोड्या वेळात सपोनि श्री पाटील व सोपनि श्री खंडागळे असे मोटारसायकल वरून आम्ही थांबलेल्या ठिकाणी आले. त्यानंतर मी सपोनि श्री खंडागळे व सपोनि श्री पाटील यांचेशी गुन्हयांचे अनुषंगाने चर्चा केली त्यावेळी सपोनि श्री खंडागळे यांनी पुढे कसे करायचे याबाबत मला विचारले असता मी त्यांना तुम्ही सांगाल तस असे बोलले त्यावर सपोनि श्री खंडागळे यांनी तुमच्या काय अपेक्षा आहे तुम्ही सांगा तसे आम्हास पुढंच बोलता येईल असे सांगितले. त्यावर मी त्यांना इंटरिम झाला असलेबाबत सांगितले.त्यानंतर सपोनि श्री खंडागळे यांनी लाचेच्या रक्कमेबाबत मला यांना वरीष्ठांना पण इकडे-तिकडे करावे लागते असे सांगितले. त्यावर मी सपोनि श्री खंडागळे यांना सपोनि श्री पाटील यांनी एक लाख रूपये सांगितले असल्याचे बोललो असता सपोनि श्री खंडागळे यांनी बस असे बोलले त्यानतर मी एक लाख रूपये ते पुर्ण करू असे बोललो त्यावर लोकसेवक श्री खंडागळे यांनी बरोबर आहे असे बोलले व मला उद्या संध्याकाळी पाच वाजता भेटण्यास बोलविले त्यानंतर मी त्यांना शक्यतो एक लाखामध्ये विषय संपु दे असे बोललो असता सपोनि श्री खंडागळे यांनी प्रयत्न करतो असे सांगितले.त्यानंतर आम्ही कार मध्ये बसुन पडताळणी थांबलेल्या ठिकाणी निघुन आलो मी व पंच नंबर 1 श्री धगे असे माझा चालक श्री अनंत सुभेदार यांचे सह पडताळणी पथक खांबलेल्या ठिकाणी श्री साई हॉस्पीटल जवळ परत आलो. सहा.पोलीस निरीक्षक श्री पाटील, सहा.पोलीस निरीक्षक श्री खंडागळे याने तक्रारदार यांचे विरुध्द चे दाखल गुन्हयाचे तपासामध्ये सदम करणेकरीता तसेच गुन्ह्याचे अनुषघाने मा. न्यायालयात म्हणणे सादर करणेकरीता पुर्वी मागणी केले प्रमाणे एक लाख रुपये लाचेची मागणी करुन दि.12/010/2023 रोजी 17.00 वा भेटण्यास बोलविल्याचे निष्पन्न झाल्याने पोलीस निरिक्षक श्री गलांडे यांनी सहा.पोलीस निरीक्षक श्री पाटील ,सहा.पोलीस निरीक्षक श्री खंडागळे यांचे विरुध्द दि.12/10/2023

रोजी लाचेचा सापळा आजमाविण्याचे ठरविले .व मला लाचेची रक्कम रुपये 100000/-रुपये घेऊन दि. 12/10/2023 रोजी 15.45 वा मोबाईवर संपर्क करुन येण्याच्या सुचना दिल्या . पोनि श्री गलांडे यांनी दिल्याले सुचनेप्रमाणे मी दि.12/10/2023 रोजी मी 15.55 वा.चे सुमारास सावंतवाडी ग्रेथील मोती तलावाजवळील हॉटेल रॉयल पॉलेस येथे जाऊन रु.नं.101 येथे पोनि श्री गलांडे,पंच साक्षीदार व कारवाई पथकास

भेटलो. त्यावेळी पोनि श्री गलांडे यांनी तक्रारदार व आम्हा पंचास सांगितले कि दि.11/10/2023 रोजी पडताळणीच्या वेळी झालेल्या संभाषणावरुन सहा.पोलीस निरीक्षक श्री पाटील ,सहा.पोलीस निरीक्षक श्री खंडागळे यांनी तक्रारदार यांचेविरुध्दचे दाखल गुन्हायचे तपासामध्ये मदत करणेकरीता तसेच गुन्ह्याचे आनुषघाने मा. न्यायालयात म्हणणे सादर करणे करीता पुर्वी मागणी केले प्रमाणे एक लाख रुपये लाचेची मागणी करुन दि. 12/10/2023 रोजी 17.00 वाजता भेटण्यास बोलविल्याचे निष्पन्न झाल्याने पोनि श्री गलांडे यांनी सपोनि श्री पाटील व सपोनि खंडागळे यांचे विरुध्द दि.12/10/2023 रोजी लोकसेवक सहा.पोलीस निरीक्षक श्री पाटील , सहा.पोलीस निरीक्षक श्री खंडागळे सावंतवाडी पोलीस ठाणे येथे लाचेचा सापळा आजमाविण्यात येईल असे सांगुन पोनि/श्री.गलांडे यांनी लोकसेवक सहा.पोलीस निरीक्षक श्री पाटील ,सहा.पोलीस निरीक्षक श्री खंडागळे यांचेविरुद्ध लाचेचा सापळा आजमाविण्याचा निर्णय घेवुन सापळा पुर्व पंचनाम्याची कार्यवाही सुरु करण्याचा निर्णय घेतला. सापळा पुर्व पंचनाम्याचे कार्यवाही दरम्यान मी पोनि/श्री.गलांडे यांचेकडे 1,00,000/- रुपये रक्कम ( 500/- रु. दराच्या एकुण 200 नोटा )नियोजित सापळा केस मध्ये वापरावयाची रक्कम म्हणुन हजर केले. त्यानंतर पोनि/श्री. गलांडे यांचे सुचनेप्रमाणे दोन्ही पंचानी माझी अंगझडती घेतली. त्यानंतर पथकातील अँमलदार यांनी मी लाचेची रक्कम म्हणुन हजर केलेल्या नोटांचे नंबर लॅपटॉपमध्ये टंकलिखित करुन घेतले. त्यानंतर त्याची प्रिंट मारुन त्या कागदावर पोनि/श्री.गलांडे व पंचानी सह्या केल्या. त्यानंतर पथकामधील सफौ/जाधव यांनी मला व दोन्ही पंचांना अॅन्थ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायलेट बॅटरी दाखवुन त्याची माहीती देवुन गुणधर्म समजावुन सांगितले. तसेच त्याबाबतचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर सदर नोटांना अन्थ्रासीन पावडर लावुन त्या नोटा माझे पॅन्टचे समोरील उजवे खिशात ठेवुन दिल्या. त्यानंतर सुमारे 17.30 वा.पर्यंत दोन्ही लोकसेवक यांचेपैकी कोणाचाही मला फोन न आल्याने पोनि/श्री.गलांडे यांचे सुचनेवरुन लोकसेवक हे पोलीस ठाणे येथे आहेत अगर कसे याची खात्री करण्यासाठी मी सपोनि/श्री.पाटील यांना मोबाईल वर फोन केला असता सपोनि/श्री.पाटील यांनी ते कामा निमीत्त बाहेर गेले असल्याचे सांगुन सपोनि/श्री.खंडागळे हे पोलीस ठाणे येथे हजर आहेत अगर कसे हे फोन करुन कळवितो असे सांगितले. त्यानंतर लगेचच सपोनि/श्री.पाटील यांनी मला फोन करुन सपोनि/श्री.,खंडागळे हे सावंतवाडी पोलीस ठाणे येथे असुन मला त्यांना भेटण्यास सांगितले. सदर हकिगत मी पोनि/श्री.गलांडे यांना सांगितली. त्यानंतर पोनि/श्री.गलांडे यांनी माझेत व सपोनि/श्री.सुरज पाटील यांचेत झालेल्या फोनवरुन सपोनि/श्री.पाटील कामानिमीत्त बाहेर असुन , सपोनि/श्री.खंडागळे हे सावंतवाडी पोलीस ठाणे येथे हजर असुन मला सपोनि/श्री.खंडागळे यांना भेटण्यास सांगितल्याचे स्पष्ट झाल्याने पोनि/श्री.गलांडे यांनी सपोनि/श्री.खंडागळे यांचेविरुद्ध सावंतवाडी पोलीस ठाणे येथे लाचेचा सापळा आजमाविण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर पोनि/श्री.गलांडे यांनी मला व दोन्ही पंच व सापळा पथकातील कर्मचारी यांना सापळा कारवाईचे अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत खालीलप्रमाणे सुचना दिल्या. सदर सापळापुर्व पंचनाम्याची कार्यवाही ही हॉटेल रॉयल पॅलेस येथे करण्यात आली. त्यानंतर पोनि/श्री.गलांडे यांचे सुचनेवरुन पोना/आटपाडकर यांनी व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन सुमारे 17-50 वाजता माझी व पंचाची वक्तव्ये ध्वनीमुद्रीत करुन घेतली. त्यानंतर सुमारे 17-55 वाजता माझेकडे व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन त्यानंतर मी व पंच श्री.ढगे असे लाचेची रक्कम देण्यासाठी माझे मोटार सायकलने सावंतवाडी पोलीस ठाणे येथे रवाना झालो. आमचे मागोमाग सापळा पथक देखील रवाना झाले. त्यानंतर सापळा पथक सावंतवाडी पोलीस ठाणे येथे सापळा रचुन थांबुन राहीले. त्यानंतर पोलीस ठाण्याचे आत गेलो. त्यावेळी पंच श्री.ढगे हे पोलीस ठाण्याचे मुख्य प्रवेशद्वाराजवळ थांबुन राहिले. त्यानंतर मी पोलीस ठाण्याचे आत जावुन सपोनि/श्री.खंडागळे यांची त्यांचे केबीनमध्ये भेट घेतली. त्यावेळी त्यांचे केबीन मध्ये श्री.गोते साहेब हे देखील होते. त्यावेळी मी श्री. खंडागळे यांचेशी माझे विरुद्ध दाखल गुन्ह्याचे संदर्भात चर्चा केली. त्यानंतर पोलीस ठाणेमध्ये काही गोंगाट चालु असल्याने सपोनि/श्री.खंडागळे हे मला या असे बालवुन ते केबीनच्या बाहेर गेले व मला त्यांचे मागे येण्याचा ईशारा केला. त्याप्रमाणे मी सपोनि/श्री. खंडागळे यांचे मागोमाग केबीनमधुन बाहेर आलो त्यावेळी सपोनि/श्री.खंडागळे व मी पोलीस ठाण्याचे पुरुष लॉकअपजवळ गेलो. त्यावेळी सपोनि/श्री.खंडागळे यांनी ईशा-याने लाचेची मागणी केली त्याप्रमाणे मी माझे पॅन्टचे समोरील उजव्या खिशातील लाचेची रक्कम माझे उजवे हाताने बाहेर काढुन ती सपोनि/श्री.खंडागळे यांचेसमोर धरली. सपोनि/श्री.खंडागळे यांनी उजवे हाताने स्वीकारुन डावे हातात धरला. त्यानंतर मी पोलीस ठाण्याचे बाहेर येवुन सापळा पथकास दिसेल अशाप्रकारे डावा हात केसांवर फिरवुन लोकसेवक यांनी पैसे स्वीकारल्याबाबत

पुर्वनियोजित ईशारा केला त्यावेळी पोनि/श्री.गलांडे, पंच व सापळा पथक असे माझे जवळ आले त्यानंतर पोनि/श्री. गलांडे यांनी सावंतवाडी पोलीस ठाणे येथे जावुन सपोनि/खंडागळे यांना लाचेची रक्कम स्वीकारताना रंगेहात पकडले व त्याचेकडुन लाचेची रक्कम हस्तगत करण्यात आली. तसेच पोनि/श्री.गलांडे यांनी सपोनि/सुरज पाटील यांचेबाबत पोलीस ठाणे येथे चौकशी केली असता ते पोलीस उपनिरीक्षक सुरज पाटील असे असल्याचे समजले. तसेच ते ड्युटी निमीत्त बाहेर गेले असल्याने त्यांना ताब्यात घेता आले नाही. अशा रितीने सावंतवाडी पोलीस ठाणे येथे माझेविरुद्ध दाखल असलेल्या कॉ.गु.रजि.नं.252/2023 भादंवि क.420 वगैरे गुन्ह्याचे तपासामध्ये मला मदत करणेकरीता लोकसेवक1)श्री.सागर संपत खंडागळे,वय 36, सहायक पोलीस निरीक्षक, सावंतवाडी पोलीस ठाणे, ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग व 2)श्री.सुरज जग्गनाथ पाटील, वय 34, पोलीस उपनिरीक्षक, सावंतवाडी पोलीस ठाणे, ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग यांनी दिनांक 09.10.2023 रोजी तसेच दिनांक 11.10.2023 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान पंचासमक्ष 1,00,000/- रुपये लाचेची मागणी केली. त्या अनुषंगाने दिनांक 12.10.2023 रोजी सापळा कारवाईचे वेळी 18.22 वाजता माझेकडुन सावंतवाडी पोलीस ठाणे येथे पंच साक्षीदारा समक्ष लोकसेवक 1)श्री.सागर संपत खंडागळे,वय 36, सहायक पोलीस निरीक्षक, सावंतवाडी पोलीस ठाणे यांनी 1,00,000/- लाचेची रक्कम स्वीकारताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले. त्यांचेकडुन लाचेची रक्कम हस्तगत करण्यात आलेली आहे. म्हणुन माझी 1)श्री.सागर संपत खंडागळे,वय 36, सहायक पोलीस निरीक्षक, सावंतवाडी पोलीस ठाणे, ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग व 2)श्री.सुरज जग्गनाथ पाटील, वय 34, पोलीस उपनिरीक्षक, सावंतवाडी पोलीस ठाणे, ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग यांचेविरुद्ध फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Rishikesh bhausaheb Adhikari (I (Inspector)) / API **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Rishikesh bhausahel
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** API